MAHADISCOM

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५वा मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई.४०००५१.
फोन: (वै)२६४७४७५३ (का)२६४७४२११; फॅक्स २६४७२३६६

**क्र पी-कॉम/रिकव्हरी/५९३२** **दिनांक : ०८.०३.२००६.**

## परिपत्रक क्रमांक .२७

**विषय**: - वीज मीटर रिडींग ,डाटा पंचिंग व वीज बिल वितरण तसेच स्पॉट बीलींगचे काम अॅप्रेंन्टीसांच्या (शिकाऊ उमेदवार) सहकारी संस्थांना देण्याबाबत.

---

वीज मीटर वाचन, डाटा पंचींग, वीज देयक वितरण व स्पॉट बीलींग ही कामे अॅप्रेंटीसांच्या सहकारी संस्थांना देण्यात यावीत म्हणून महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन व अॅप्रेंटीस कृती समिती यांनी महावितरण कंपनीकडे वेळोवेळी मागणी केली होती. त्यानुसार वरील कामे देतांना अॅप्रेंटीस सहकारी संस्थांना प्राधान्य देण्याचे मान्य करण्यात आलेले आहे.

अॅप्रेंटीस सहकारी संस्थांना देण्यात येणा-या सदर कामांची जबाबदारी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनने स्विकारलेली आहे. त्यानुसार त्यांनी अॅप्रेंटीस सहकारी संस्थांची जिल्हावार सादर केलेली यादी सोबत जोडलेली आहे.

वीज मीटर वाचन, डाटा पंचींग , वीज देयक वितरण व स्पॉट बीलींग ही कामे अॅप्रेंटीस सहकारी संस्थांना खालील अटींवर देण्याचे महावितरण कंपनीने मान्य केलेले आहे.

१) विविध सर्कल/डीव्हीजन मधून वरील कामांकरीता वेळोवेळी निविदा / देकार (कोटेशन) मागविण्यात येतात. यामध्ये सदर संस्थांनी सहभाग घेऊन या निविदा /देकार (कोटेशन) भरणे आवश्यक आहे. निविदा /देकारमध्ये आलेल्या तुलनात्मक तक्त्यात कमीत कमी (माफक /योग्य) दरात काम करण्यास सदर संस्था तयार असल्यास अॅप्रेंटीस सहकारी संस्थांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

२) सदर कामे करताना अॅप्रेंटीस सहकारी संस्थांकडून तांत्रिक चुकांमुळे वितरण कंपनीला आर्थिक हानी झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी वर्कर्स फेडरेशनने घेण्याचे मान्य केलेले आहे. त्या बाबतचे हमी पत्र रु. २००/- च्या स्टँप पेपरवर वर्कर्स फेडरेशनकडून घेण्यात यावे. सदर हमी पत्र वर्कर्स फेडरेशनच्या राज्य पातळीवरील अध्यक्ष/ सचिव यांच्या स्वाक्षरीचे घेण्यात यावे. सदर हमी पत्र घेतल्यामुळे अशा संस्थांना खालील प्रमाणे सवलती देण्यात याव्यात.
   अ) सदर संस्थांकडून इसार (EMD) रक्कम घेण्यात येऊ नये.
   ब) अनामत रक्कम घेण्यात येऊ नये.

३) दिलेल्या कामाची व हमी पत्राची मुदत ही फक्त सहा महिन्याच्या कालावधीकरीता राहील.

४) ज्या विभागातील वीज मीटर वाचन, डाटा पंचींग, वीज देयक वितरण व स्पॉट बीलींगची कामे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेली असतील त्या विभागातील कामे अॅप्रेंटीस सहकारी संस्थांना देण्यात येऊ नये.

५) सदर कामाचे कंत्राट जर आधीच खाजगी कंत्राटदारांना दिलेले असेल तर त्या कामाचे कंत्राटदारासोबतचे करार पुर्ण झाल्याशिवाय सदर कामे अॅप्रेंटीस संस्थांना देण्यात येऊ नये.

याबाबत सुचित करण्यात येते की, स्थानिक अॅप्रेंटीस सहकारी संस्थांना सदर अटी बाबत अवगत करण्यात यावे व उपरोक्त अटींना अधीन राहून वीज मीटर वाचन, डाटा पंचींग, वीज देयक वितरण व स्पॉट बीलींग ही कामे अॅप्रेंटीस सहकारी संस्थांना देण्यात यावीत.

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com